# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

दूरध्वनी – ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६

E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in


जा.क्र.तंशिविकापु/विवि/डि.बी.टी.पोर्टल/ २०१९/ 5017 दिनांक :- 04 DEC 2019

प्रति,

प्राचार्य/संचालक

या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व तंत्रशिक्षण संस्था.

विषय :- सन 2019-20 साठी शिष्यवृत्ती योजनांच्या अमलबजावणीबाबत...

संदर्भ :- १. संचालनालयाचे पत्र क्र 18/तशिस/ईबीसी/2019/540 दिनांक 02/12/2019

उपरोक्त संदर्भिय पत्राद्वारे प्राप्त निर्देशानूसार सर्व संस्थाना सुचित करण्यात येते की, महाडीबीटी पोर्टल वरील
१.राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना २.डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भता योजना
३.राज्य शासनाची अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती योजना (भाग -१ वैद्यकीय अभ्यासक्रम वगळून)

योजनांचा डीबीटी पोर्टलद्वारे लाभ विद्यार्थ्यांना देण्यासाठी या कार्यालयाकडून ज्या विद्यार्थ्याचे पोर्टलमार्फत देयक जनरेट करुन अधिदान व लेखा कार्यालयाकडून रक्कम मंजूर करुन सेंट्रल पूल खात्यामध्ये वितरणसाठी देण्यात आले आहे अशा विद्यार्थ्यांना.

१. त्यांच्या लॉगीनमध्ये पहिला हप्त्याची रक्कम प्राप्त करण्यासाठी REDEEM (रिडिम) बटनचा पर्याय प्राप्त होतो. असा पर्याय प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांनी पोर्टलवरील त्यांच्या लॉगीन आयडीचा वापर करुन REDEEM (रिडिम) बटनवर क्लिक करणे आवश्यक आहे. त्यानंतरच पोर्ठलमार्फत त्या विद्यार्थ्यांना योजनेच्या पहिल्या हपत्याची रक्कम वितरणाची कार्यवाही सरु होते.

२. तसेच, ज्या विद्यार्थ्यांना योजनेच्या लाभाच्या पहिल्या हप्त्याची रक्कम प्राप्त होते अशा विद्यार्थ्याचा लाभाचा दुसरा हप्ता मंजूर करण्यासाठी संस्थांना त्यांच्या प्राचार्याचा लॉगीन आयडीद्वारे संबधीत विद्यार्थ्याची उपस्थिती (student Attendance) भरावी लागते त्यानंतरच विद्यार्थ्यांना दुस-या हप्त्याच्या रककम वितरणाची कार्यवाही सुरु होते व विद्यार्थ्यांना योजनेच्या दुस-या हप्त्याची रक्कम प्राप्त करण्यासाठी उपलब्ध झालेल्या REDEEM बटनवर क्लिक करणे आवश्यक असते.

३. ज्या विद्यार्थ्यांनी पहिला /दुसरा हप्ता प्राप्त करण्यासाठी त्यांच्या लॉगीन आयडीमध्ये उपलब्ध असलेल्या Redeem Option Click करण्याची (Use of Redeem Option) कार्यवाही केलेली नाही अशा विद्यार्थ्याची यादी संस्थेच्या **प्राचार्याच्या लॉगीनमध्ये Status wise Application Detail Report अंतर्गत उपलब्ध आहे (Voucher not Redeem)** तसेच

४. दुसरा हप्ता प्राप्त करण्यासाठी ज्या विद्यार्थ्याची उपस्थिती (Student Attendance) भरण्याची कार्यवाही संस्था स्तरांवर प्रलंबित आहे अशा विद्यार्थ्याची यादी **संस्थेच्या प्राचार्याच्या लॉगीनमध्ये Status wise Application Detail Report अंतर्गत उपलब्ध आहे(Pending at Institute of II Installment )**

**आज रोजीदेखील काही विद्यार्थी /संस्था यांचेकडून उपरोक्त कार्यवाही प्रलंबित राहात आहे ज्याची अद्ययावत यादी संस्थांच्या लॉगीन आयडीमध्ये उपलब्ध आहे.**

या पत्राद्वारे पुनःश्च सर्व या अनुषंगाने सर्व संस्थांना अंतिम सूचना देण्यात येते की, संस्थेच्या प्राचार्याच्या लॉगीनमध्ये Status wise Application Detail Report अंतर्गत उपलब्ध अद्यायावत यादीनुसार संस्था /विद्यार्थी सतरांवरील प्रलंबित कार्यवाही (voucher not Redeem) Pending at Institute for II Installment etc) संस्था/विद्यार्थ्याकडून पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्याची उपस्थिती (Studemt attendance ) भरण्याची कार्यवाही तसेच संस्थामार्फत विद्यार्थ्यांना विद्यार्थी स्तरांवरील प्रलंबित कार्यवाही (Voucher not Redeem) तात्काळ (**३ दिवसात आत** ) पूर्ण करण्यात यावी तसेच उपरोक्त कारणांमुळे जर योजनेच्या लाभापासून कोणताही पात्र विद्यार्थी / संस्था वंचित राहिल्यास तर याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संचालनायाची न राहता, संबंधित संस्था व विद्यार्थ्याची राहील याची नांद घ्यावी .

(डॉ.दि.रा.नंदनवार)

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे